ePaper

# “धोका देणाऱ्यांना कधी सोडायचं नसतं”: अमित शहा



|वर्ष - 6 | अंक - 304 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मुजरा मानाचा

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा आज जन्मोत्सव सोहळा. त्यानिमित्त रयतेच्या राजास मानाचा मुजरा.



www.mahaenews.com | रविवार, दि. 19 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘पवना’ प्रकरणात माझी बदनामी!

## » अजित पवार यांची खंत : बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प व्हावा ही इच्छा

। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**पदवीधर, शिक्षकांच्या मनात काय आहे हे महाराष्ट्राने जाणून घेतले. भावनिक नव्हे, तर विकासाची निवडणूक आहे. भाजपला कार्यकर्ते तयार करता आले नाहीत. आमचे कार्यकर्ते घेतले. त्यांना आमदार केले. राष्ट्रीय पक्ष म्हणवून घेणाऱ्यांना कार्यकर्ते तयार करता आले नाहीत, ही शोकांतिका आहे. महापालिका भ्रष्टाचाराने बरबटली. पाण्याचा प्रश्न गहन झाला आहे. पवना धरणातून बंदिस्त जलवाहिनीतून पाणी आणण्याची माझी प्रामाणिक भूमिका होती. पण, मला बदनाम करण्यात आले. अजूनही हा प्रकल्प रखडला आहे, अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे.**

### कलाटेंना बारामतीची उमेदवारी देण्याचे बाकी होते

» बंडखोर राहुल कलाटे यांना आगामी मावळ लोकसभेची उमेदवारी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची आमदारकी देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते थांबले नाहीत. शेवटी अजितदादांचा बारामती विधानसभेचा राजीनामा घेऊन तिथली जागा ‘या’ बंडखोराला देणं फक्त बाकी होतं असा गौप्यस्फोट आमदार सुनील शेळके यांनी केला. चिंचवडची उमेदवारी जाहिर होण्यापूर्वी पहाटे दोन वाजेपर्यंत अजितदादा पवार बंडखोर राहुल कलाटे यांना विनंती करत होते. महापालिका निवडणुक तोंडावर आहे. ज्याला उमेदवारी मिळेल त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले होते. आगामी लोकसभेची तयारी करा, बंडखोरी करू नका अशी विनंती केली. स्थानिक स्वराज्य संस्थेतून अनिल भोसलेंची जागा रिक्त झालीय ती जागा देतो असेही सांगितले. मात्र पठ्या थांबायला तयार नव्हता, असेही आमदार शेळके म्हणाले.



**“जे बंडखोर म्हणून उभे राहिले त्यांनी सुरूवातीला आमच्यावर टीका केली. ही लढत नुराकुस्ती असल्याचे म्हटले. ज्यावेळेला माघारीचा काळ संपला तेव्हा बंडखोर म्हणायला लागला की आमच्यावर अन्याय झाला. मुळातचं सगळीकडं फिरून आलेला हा महाशय आहे. तरीही यांची बाजू मांडणारा मीच होतो. हा बंडखोर फक्त महाविकास आघाडीची मतं खायला उभा राहिलेला आहे. स्वतःच्या हितासाठी हा उभा राहिला आहे. कुणी उभे केले, काय त्यांचा अजेंडा जनतेपुढे सांगावे”.**

**- सुनील शेळके, आमदार.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारार्थ पिंपळे निलख येथे जाहिर सभा संपन्न झाली. याप्रसंगी विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, आमदार शशिकांत शिंदे, महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, शिवसेना शहरप्रमुख सचिन भोसले आदी उपस्थित होते.

मागील पाच वर्षे गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता असतानाही पाणी का आणू शकले नाहीत. भाजपच्या अंगात धमकच नाही. जाणीवपूर्वक महापालिका निवडणुका लावल्या जात नाहीत. तोडफोडीचे राजकारण महाराष्ट्रातील जनतेला आवडले नाही. जनता चिडली आहे.

त्यामुळे महापालिकेची निवडणूक लावली जात नाही, असा घणाघातही पवार यांनी केला.

# दिवंगत जगताप यांच्यामुळेच पिंपळे सौदागर स्मार्ट!

## » अश्विनी जगताप : लक्ष्मणभाऊंच्या कार्याचा वसा जोपासणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप पिंपळेसौदागरच्या स्मार्ट सिटीत समावेश करून या भागाचा सर्वाधिक विकास केला. त्यांची विकासाची दूरदृष्टी शहरातील इतर कोणत्याही भागापेक्षा पिंपळेसौदागरकरांना जास्त लाभली. पिंपळेसौदागरचा स्मार्ट सिटीत कायापालट झाला.**

इतर राजकीय पक्षांपेक्षा भाजपने या भागाच्या विकासात जास्त योगदान दिले आहे. येथील जनतेच्या ऋणातून भाजप आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी विकास करून उतराई होण्याचा प्रयत्न केला. मीही लक्ष्मण जगताप यांचीच अर्धांगिनी आहे. मी सुद्धा आमदार झाल्यानंतर माझ्या पतीचाच विकासाचा कित्ता गिरवणार आहे. त्यासाठी पिंपळेसौदागरकरांनी मला भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप यांनी शनिवारी केले.



पोटनिवडणुकीतील भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी शनिवारी पिंपळेसौदागरमध्ये पदयात्रा काढली. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन नागरिकांसोबत संवाद साधला. यावेळी माजी उपमहापौर नानी घुले, माजी नगरसेविका निर्मला कुटे, सोनाली गव्हाणे, नगरसेवक शत्रुघ्न काटे, सारिका बाऱ्हाडे, कुंदा भिसे, गिरीश जाचक, सोमनाथ काटे, संतोष नवले, नवीन लायगुडे, कपिल कुंजीर, अतुल पाटील, जयनाथ काटे, संजय भिसे आदी उपस्थित होते.

### जनता भाजपालाच विजयी करेल : अश्विनी जगताप

» अश्विनी जगताप म्हणाल्या, “दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड मतदारसंघातील सर्वच जनतेवर कुटुंबासारखे प्रेम केले. पण पिंपळेसौदागरच्या जनतेवर त्यांनी जरा जास्तच प्रेम केले. कारण शहराचा स्मार्ट सिटीत समावेश होताच पिंपळेसौदागरचा कायापालट करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या भागात स्मार्ट सिटीअंतर्गत अनेक विकासकामे त्यांनी केली. प्रशस्त रस्ते केले. मैदाने, उद्याने विकसित केली. शहराच्या अन्य भागांपेक्षा जास्त विकास हा पिंपळेसौदागरचा झालेला आहे. हे सर्व करण्यासाठी दिवंगत लक्ष्मण जगताप यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळे येथील जनतेने भाजपला साथ द्यावी. मी लक्ष्मण जगताप यांचीच अर्धांगिनी आहे. आमदार झाल्यानंतर माझ्या पतीचाच विकासाचा कित्ता गिरवणार आहे. कोणी कितीही वल्गना करत असले तरी आमदार लक्ष्मण जगताप यांनीच पिंपळेसौदारचा कायापालट केला आहे, हे सत्य आहे. त्यामुळे येथील जनता भाजपलाच विजयी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.”

# शिवजयंतीनिमित्त रविवारी पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतुक बंद!

## » वाहतुकीमध्ये बदल: वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा



**।पुणे। महाईन्यूज।**

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमीत्त निघणाऱ्या मिरवणुकांमुळे रविवारी (ता.19) शहराच्या मध्यवर्ती मध्यभागातील वाहतुकीमध्ये बदल करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार वाहतुकीमध्ये बदल करण्यात येणार असून त्यादृष्टीने वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतुक शाखेच्यावतीने करण्यात आले आहे.**

शिवजयंतीनिमित्त रविवारी लक्ष्मी रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज रस्ता भागातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. रविवारी (ता.19) सकाळी सात वाजल्यानंतर मध्यवर्ती भागातील वाहतूकीत बदल करण्यात येणार आहे.

गर्दी कमी होईपर्यंत नेहरु रस्ता, लक्ष्मी रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, बाजीराव रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतुक शाखेचे पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे.

### बंद रस्ते व पर्यायी मार्ग

» छत्रपती शिवाजी महाराज रस्त्याने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी जंगली महाराज रस्त्यावरील स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे) जंगली महाराज रस्ता, खंडोजी बाबा चौक, टिळक चौकमार्गे इच्छितस्थळी जावे.

» केळकर रस्त्याने अप्पा बळवंत चौक, बुधवार चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार वळविण्यात येणार आहे

» लक्ष्मी रस्त्यावरील मिरवणूक सोन्या मारुती चौकातून मार्गस्थ झाल्यानंतर संत कबीर चौकातील वाहतूक वळविण्यात येईल

» पूरम चौकातून बाजीराव रस्त्याने शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी टिळक रस्ता, अलका टॉकीज चौकमार्गे इच्छितस्थळी जावे.

» मिरवणूक सुरू झाल्यानंतर अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे तसेच बाजीरावर रस्त्याने फुटका बुरूज चौकाकडे जाणारी वाहतूक थांबविण्यात येईल.

» या भागातील वाहतूक केळकर रस्त्याने वळविण्यात येणार आहे.

» वाहनचालकांनी शनिवार पेठेतील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावरुन बालगंधर्व चौकाकडे जावे.



# 'भलेही धनुष्य हिरावून घ्याल, पण मनुष्य आजही मातोश्रीसोबत'

## ठाकरे गटाच्या शिवसैनिकांचे आंदोलन

**।पुणे।महाईन्यूज। प्रतिनिधी।**

निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षनाव तसेच धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे शिंदे गटाकडून जल्लोष करण्यात येत असताना. दुसरीकडे ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का आहे.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयाचा विरोध करण्यासाठी पुण्यात ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी शिंदे गटाविरोधात आंदोलन केले. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात ठाकरे गटाचे शिवसैनिक सहभागी झाले होते. 'होय, आम्ही उद्धवजी बाळासाहेब ठाकरेंसोबत, भले ही धनुष्य हिरावून घ्याल पण मनुष्य आजही मातोश्रीसोबत' हा फलक घेऊन शिवसैनिक सहभागी झाले होते. तर हा फलक नागरिकाचे लक्ष वेधून घेत होता.यावेळी ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे म्हणाले की, केंद्र सरकारच्या दबावाखाली सर्व यंत्रणा काम करीत असून कालचा देखील तसाच निर्णय घेतला आहे. आमचा धनुष्यबाण जरी ४० चोरांनी घेतला असला तरी राज्यातील सर्व जनता आणि आम्ही उद्धव ठाकरे यांच्या सोबत आहे. हे एवढच या सर्व गद्दारानी लक्षात ठेवावं, अशा शब्दात शिंदे गटावर त्यांनी निशाणा साधला.




---

# अपक्ष उमेदवार वाकडवाला यांचा प्रचार जोरात!

## » चिंचवड पोटनिवडणूक : प्रस्थापित पक्षांना दिले आव्हान

**।पिंपरी।महाईन्यूज। प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीच्या प्रचाराला वेग आला आहे. प्रत्येक उमेदवार आपण निवडून आल्यानंतर मतदार संघाचा कायापालट कशा प्रकारे करणार आहोत, याचा जाहिरनामा लोकांपर्यंत पोहोचविण्यात व्यस्त आहेत. त्यापैकी जावेद रशीद शेख वाकडवाला यांच्याही प्राचाराचा झंझावात पहायला मिळत आहे.**



जातीयवादाला छेद देऊन मतदार संघातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा अजेंडा पोहोचविण्याचा मनोदय शेख यांनी व्यक्त केला आहे. नारळाची बाग हे निवडणूक चिन्ह असलेले शेख यांनी आपल्या जाहिरनाम्यात म्हटले आहे की, आजपर्यंतच्या राजकारण्यांनी केवळ मताच्या हव्यासापोटी राजकारण केले आहे. मतदार संघातील नागरिकांना केवळ आश्वासने दिलेली आहेत.

मात्र अजूनही मतदार संघातील अनेकाकडे रेशन कार्ड, आधार कार्ड नाहीत.ज्येष्ठांना विविध योजना, पेंशन मिळत नाही, अशी टीका वाकडवाला यांनी केली आहे. याविरोधात आवाज उठविण्यासाठीच आपण ही निवडणूक लोकशाही मार्गाने लढवत असून, चिंचवडकरांच्या सेवेची संधी मिळावी, असे मत जावेद रशीद शेख यांनी व्यक्त केले आहे.

> **आतापर्यंत येथील राजकारण्यांनी जाती-पातीचे राजकारण केले. प्राधीकरणातील 12.5 टक्के परतावे मिळालेले नाहीत. चिंचवड मतदार संघात कब्रस्तानाचा गंभीर प्रश्न आहे. कित्येक वर्षापासूनची ही मागणी प्रलंबित आहे. मदरशांची अवस्था बिकट आहे. आज दाढी, टोपी तसेच मुस्लिम समाजाचे नाव ऐकूनच येथील राजकारणी तिरस्काराची वागणूक देतात. बोटावर मोजण्याइतकेच लोक चांगले आहेत. जे चांगले आहेत ते सत्तेत नाहीत. जे सत्तेत आहेत ते तिरस्कार करतात.**
>
> **- जावेद रशीद शेख वाकडवाला, अपक्ष उमेदवार.**

# कोकणी माणूस जगतापांच्या पाठिशी!

## » आमदार भरत गोगावले : अश्विनी जगताप यांचा मताधिक्याने निवडून द्या

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोकणी माणूस अतिशय सरळ आणि धाडसी आहे. हा माणूस सत्याच्या बाजूने नेहमी उभा राहतो. भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचा विकास केला हे सत्य आहे. या विकासामुळेच आज अनेक कोकणी माणसांना पिंपरी-चिंचवडमध्ये रोजगार उपलब्ध झाला हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे चिंचवड मतदारसंघातील कोकणी माणसाने दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन विधीमंडळातील शिवसेनेचे पक्षप्रतोद व आमदार भरत गोगावले यांनी केले.**



कोकणी माणूस अतिशय सर शिवसेना पक्षप्रतोद व आमदार भरत गोगावले यांनी काळेवाडी आणि रहाटणी भागात राहणाऱ्या कोकणी माणसांची भेट घेतली. सात ठिकाणी कोपरा सभा घेऊन त्यांनी कोकणी माणसासोबत संवाद साधला. अनेकांच्या घरी जाऊन चिंचवड पोटनिवडणुकीबाबत चर्चा केली.

यावेळी शिवसेनेचे श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, शिवसेनेचे नेते इरफान सय्यद, माजी नगरसेविका निता पाडाळे, माजी नगरसेवक प्रमोद ताम्हणकर, प्रभाग स्वीकृत सदस्य देवीदास पाटील, भाजप युवा मोर्चा ओबीसी सेलचे कैलास सानप, अश्विनी कांबळे, कोकण महिला मंडळाच्या अध्यक्षा व शिवसेना महिला आघाडीच्या माजी शहरप्रमुख सुशीला पवार, शिवसेनेचे तात्या पालकर, प्रहारचे संजय गायखे, बाबासाहेब जगताप, प्रशांत दाकवे, प्रकाश लोहार यांच्यासह मराठवाडा मित्र मंडळ, खानदेश मित्र मंडळ, अजिंक्य मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

आमदार भरत गोगावले म्हणाले, "भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे पक्षनिष्ठ होते. तेवढीच जनतेप्रतीही ते निष्ठावान होते. त्यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघात विकासकामांचा डोंगर उभा केलेला आहे.

या मतदारसंघातील कोणत्याही रस्त्याने माणूस गेला तर त्याला सहज लक्षात येईल की मतदारसंघात काय विकास झाला आहे. अशा विकासपुरूषाने आपल्यातून लवकर निघून जाणे दुःखद आहे.

आता त्यांच्या विकासाचा वारसा त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या माध्यमातून जनतेला पुढे न्यायचे आहे. त्यासाठी पोटनिवडणुकीत कोकणी माणसाने तसेच मराठवाडा आणि खानदेश भागातील नागरिकांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मोठ्या मताधिक्याने निवडून दयावे. कोकणी माणूस सरळ, साधा आणि धाडसी आहे.

> **कोकणी माणूस कधीच असत्याची बाजू घेत नाही. तो नेहमी सत्याची लढाई लढतो. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी मतदारसंघाचा विकासातून कायापालट केला हे सत्य आहे. या विकासामुळे अनेक कोकणी बांधवांना आणि भगिनींना पिंपरी-चिंचवडमध्ये रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे चिंचवड मतदारसंघातील प्रत्येक कोकणी बांधवाने अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या पाठीशी उभे राहावे.**
>
> **- भरत गोगावले, आमदार.**

> **"कोकणी माणसामुळे शिवसेना मोठी झाली आहे. शिवसेना आणि कोकणी माणसाचे नाते एकदम घट्ट आहे. दुसरीकडे शिवसेना आणि भाजपची पारंपारिक युती आहे. चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप या युतीच्या उमेदवार आहेत. त्यामुळे मतदारसंघात राहणाऱ्या प्रत्येक कोकणी बांधवाने भाजपला भरघोस मतांनी निवडून द्यावे."**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार.**

---

# तुषार कामठे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश!

## » पिंपळे निलखमध्ये सभा : भाजपाला महाविकास आघाडीचे आव्हान

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीत भाजपाला जोरदार धक्का बसला आहे. पिंपळे निलख येथील माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्यासह काळेवाडी येथील माजी नगरसेविका विजया सुतार यांनी आज (दि.१८) राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत हे प्रवेश करण्यात आले.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारार्थ पिंपळे निलख येथे जाहिर सभा संपन्न झाली.

### पिंपळे निलखमध्ये राष्ट्रवादीला मताधिक्य देवू : कामठे

**»पिंपळे निलख येथील माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. कामठे यांनी नुकताच भारतीय जनता पार्टीच्या सदस्यत्व पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी लवकरच पुढील भूमिका स्पष्ट करतील असे सांगितले होते. त्यानुसार त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. कामठे यांच्या प्रवेशामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांना मोठा फायदा होणार आहे. पिंपळे निलख या प्रभागातून मोठे मताधिक्य काटे यांना मिळवून देऊ असे आश्वासन कामटे यांनी याप्रसंगी दिले आहे.**

याप्रसंगी विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, आमदार शशिकांत शिंदे, महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आदी उपस्थित होते.

यावेळी काळेवाडी येथील माजी नगरसेविका विजया सुतार व त्यांचे पती विजय सुतार यांनी देखील राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.

त्याचबरोबर बहुजन वंचित आघाडीचे प्रदेश प्रवक्ते राजन नायर, भाजपा विद्यार्थी आघाडीचे प्रसाद कांबळे यांचाही कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश झाला आहे.


## संपादकीय »

# ‘नैना’ला प्रकल्पग्रस्तांचा ना-ना!

***एखादा सरकारी किंवा खासगी प्रकल्प येण्यापूर्वी जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया सुरू होते तेव्हा शेतकऱ्यांना किंवा जमीन मालकांना भरमसाठ आश्वासने दिली जातात. जमीन देण्यास विरोध झाला तर साम, दाम, दंड, भेद ही नीती वापरली जाते.***

एमआयडीसी, त्यानंतर सिडकोकडून अशा हजारो हेक्टर जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत. यापैकी काही जमिनींवर प्रकल्प उभे राहिले तर काही जागा तशाच पडीक आहेत. नोकरी, भरपाई अशी आश्वासने देण्यात आली, पण त्यापैकी किती आश्वासनांची पूर्तता झाली, हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळेच सरकारी एमआयडीसी, सिडको यासारख्या मध्यस्थांना जमीन द्यायची म्हटली की शेतकऱ्यांच्या डोक्यात तिडिक जाते. सध्या रायगड जिल्ह्यातील उरण आणि पनवेल तालुक्यात शेतकऱ्यांच्या जमिनीवर नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) प्रकल्प राबविण्याचा घाट नैनाचे पालक असलेल्या सिडकोने घातला आहे. याला शेतकऱ्यांनी ठाम विरोध करीत दररोज एक गाव बंद करण्याचा निर्धार करून हे आंदोलन ४ मार्चपर्यंत राबविण्याचा निर्धार केला आहे.प्रश्न शेतकऱ्यांचा असल्याने जवळपास सर्वच राजकीय पक्षांना पाठिंबा देण्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही. त्यामुळे भविष्यात सिडकोकडून नैनाबाबत कोणता निर्णय घेतला जातो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. सिडकोला जमीन देण्यास विरोध असल्यानेच नैनाचे आमिष दाखविण्यात आल्याचा जो आरोप होतोय तो अगदीच तथ्यहीन म्हणता येणार नाही. शेतकऱ्यांकडून जमिनी घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडायचे हा प्रकार गेली अनेक वर्षे सुरू आहे. एमआयडीसीने कारखान्यांसाठी घेतलेल्या जमिनींबाबतही हाच प्रकार आहे. ‘प्रकल्पग्रस्त’ म्हणून आजही शेतकरी ‘न्याय द्या हो’ अशी आळवणी सरकार दरबारी करीत आहेत. यात शेतकऱ्यांचे मसिहा (!) गब्बर झाले, शेतकरी मात्र तेथेच आहेत. सिडकोबाबतही काहीसे तसेच आहे. जे पूर्वी झाले ते आता होऊ द्यायचे नाही या निर्णयापर्यंत शेतकरी आल्याने नैनाविरोधाची धार यापुढे अधिक तीव्र होत गेली तरी आश्चर्य वाटणार नाही. पनवेल परिसरात नियोजित नवी मुंबई विमानतळाचे काम सुरू आहे. स्वाभाविक जमिनीला सोन्याहून अधिक भाव आला आहे. विमानतळाच्या अनुषंगाने आसपासच्या गावांचे नागरीकरणही झपाट्याने वाढू लागल्याने चाणाक्ष बिल्डर जमातीचा तिकडे डोळा गेला नाही तरच नवल!

# झोपडपट्टी ही समाजाची गरज असताना तिला समस्या कशी ठरवता?






वास्तवात झोपडपट्टी ही समस्या नंतर आणि गरज सर्वप्रथम आहे. ही गरज झोपडीत न राहणाऱ्या समाजाबरोबरच राज्यकर्ते-प्रशासनाचीही आहे. सकाळी ९ वाजता कामावर जाणाऱ्याला घरकामाला ८ वाजता बाई यायला हवी असते. ड्रायव्हर ९ वाजण्यापूर्वी यायला हवा असतो. ही झोपडीत न राहणाऱ्यांची गरज जवळ असणाऱ्या झोपडीत राहणारेच पूर्ण करू शकतात. घरी जाण्याच्या रस्त्यावर झोपडपट्टी लागली म्हणून कितीही नाके मुरडली; तरी सकाळी ८ वाजता घरकामासाठी कामवाली येण्याची गरज हीच झोपडपट्टी पूर्ण करीत असते. ही झाली थोडक्यात झोपडीत न राहणाऱ्या शहरी समाजाची गरज.

राज्यकर्ते आणि प्रशासनाचे म्हणाल तर गरीब, असुरक्षित समाज जेवढा जास्त, तेवढे राज्यकर्ते आणि प्रशासनाला आपली ऊर्मी दाखवून देण्याची संधी जास्त. असे हे सरळ समीकरण आहे. धोरण आखणे, त्याचे नियोजन करणे, त्यासाठी वारेमाप खर्च करणे आणि या सगळ्यातून गरीब, वंचित समाजाचे हित आम्ही जपत आहोत; हे जगासमोर सतत मांडत राहाणे, त्यासाठी पुन्हा वेगळा निधी मिळवणे आणि तो खर्च करणे, यातून ‘गरिबांचा कैवारी’ अशी आपली छबी निर्माण करून मतांचे राजकारण करण्यासाठी झोपडपट्टी राज्यकर्ते आणि प्रशासनाची गरज आहे, हे उघड गुपित आहे.

इतकी गरजेची आणि आवश्यक असणारी झोपडपट्टी बेकायदेशीर कशी? त्यातील नागरिक अतिक्रमणकर्ते कसे? खरे तर हा कळीचा मुद्दा आहे. या मुद्द्यांचा, त्याच्या कारणांचा कधी विचार होणार की नाही? या परिस्थितीला अनेक कारणे असली तरी त्यातील प्रमुख कारण म्हणजे आपण (झोपडीत न राहणारे सर्व आणि शासन-प्रशासन) या गरजूंना सुरक्षित व आरोग्यदायी किमान आवश्यक निवारा देऊ शकलेलो नाही किंवा गरजू तसा तो विकत घेऊ शकतील असा मोबदला त्यांना आपण देत नाही. श्रमाला मोल नसणे, बेसुमार लोकसंख्या, जातीची उतरंड, नैसर्गिक संसाधनांचे विषम वाटप इ. अनेक कारणे असली; तरी गरजूंना किमान आवश्यक निवारा उपलब्ध करून देण्यात शासकीय यंत्रणांचे अपयश आणि अशा धोरणांबाबतची राज्यकर्त्यांची उदासीनता ही प्रमुख कारणे दुर्लक्षित करता येणार नाहीत.

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण खात्याच्या दिनांक १६ डिसेंबर १९९५ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्रात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना झाली. ज्यांचे पुनर्वसन करायचे त्याचे निकष ठरवले गेले. त्या निकषांपैकी रहिवासाची नोंद हा प्रमुख निकष आहे. त्यानुसार ती नोंद १ डिसेंबर १९९५ पूर्वीची असावी; असेही तेव्हा ठरले. नंतर राजकीय गरजेपोटी ती मुदत वाढवून १ डिसेंबर २००० अशी केली गेली. झोपडपट्टी पुनर्वसनातून मोक्याच्या जागेवर होणारे बांधकाम, त्यातून मिळणारा एफएसआय, टीडीआर किंवा इतर करांबाबतचे लाभ अशा अनेक सवलतींची उधळण करून मोठी आर्थिक उलाढाल सुरू झालीपुनर्विकास प्रकल्पांच्या तांत्रिक किंवा आर्थिक बाबींच्या तपशिलात जाणे हा उद्देश नसल्याने तसा तपशील मी इथे टाळतो. शासनदरबारी पुनर्विकासासाठी सर्वांगाने एवढी तजवीज असताना, किती झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आजपर्यंत झाले, ते इतके का रखडले असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

असे असतानाही प्रशासन अचानक एक दिवस या झोपडीधारकांना बेकायदेशीर, अनधिकृत ठरवून त्यांचा संपूर्ण अधिवास जमीनदोस्त करण्यासाठी इतके उतावीळ का झालेले असते? वास्तवात झोपडी म्हणजे झोपडपट्टीधारकांची निवाऱ्याची जागा, ते बांधकाम अनधिकृत असते; पण त्यात राहणारा नागरिक भारतीयच असतो. त्याचं नागरिकत्व बेकायदेशीर असते का? त्या घरासाठी वापरलेले बांधकाम साहित्य बेकायदेशीर असते का? वापरत असलेले नळ आणि वीजपुरवठा बेकायदेशीर असतो का? त्यासाठी भरलेले बिल बेकायदेशीर असते का? त्याच्या घरातील किराणा माल, कपडेलत्ते, त्याची खरेदी बेकायदेशीर असते का?

# रेडिओच्या ‘श्रीमंत’ आठवणी

**गावात मोजक्या घरात रेडिओ असणे, नंतर गावातील प्रत्येक घरात रेडिओ येणे या गोष्टी माझ्या पिढीने पाहिल्या आहेत. आज लग्नसोहळ्यात टीव्ही, फ्रिजसारख्या वेगवेगळ्या महागड्या वस्तू भेट दिल्या जातात.**

एकेकाळी गावगाड्यातील लग्नसोहळ्यात रेडिओ किंवा सायकल भेट मिळण्याला प्रतिष्ठा होती. आता गावातील काही घरांत रेडिओ आहेत, पण ते अडगळीत गेले आहेत. रेडिओ ऐकला जात नाही, कारण लोकांना ऐकण्याची नाही तर बघण्याची सवय लागली आहे. त्यामुळे रेडिओ केवळ आठवणीसाठी उरला आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी घरात रेडिओ असणे ही मोठी गोष्ट वाटत असे. सकाळी गावात घराघरातून रेडिओवरची गाणी ऐकायला मिळत असत. सुरुवातीला चार-दोन घरात रेडिओ असायचे. ज्यांच्याकडे रेडिओ असत त्यांच्या घरी लोक बातम्या ऐकायला जायचे. देशातील महत्त्वाच्या घडामोडी रेडिओच्या माध्यमातून गावापर्यंत पोहोचत असत.

गावात सुरुवातीला सरकारने दिलेला रेडिओ ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये आला. तो बघायला लोकांनी गर्दी केली होती, असे



जुनेजाणते लोक सांगतात. एवढ्याशा डब्यातली माणसे कशी बोलत असतील, अशी चर्चा गावकरी उत्सुकतेपोटी करत होते. आवाज कुठून येतो? लोक कसे बोलतात? याचे लोकांना आश्चर्य वाटत होते. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती.

रोज सायंकाळी सहा वाजता ग्रामपंचायतीचा शिपाई रेडिओ लावत असे. गावातील लोक कार्यक्रम ऐकत बसत. इतर कार्यक्रमापेक्षा लोकांना बातम्यांची आवड होती. बातम्या ऐकल्या की त्या दिवशी देशात, राज्यात काय घडले हे समजत असे. मग गावकरी दुसऱ्या दिवशी त्यावर चर्चा करत. त्या वेळी मोजक्या आणि महत्त्वाच्या बातम्या लोकांना समजत आणि तेवढ्यावर लोक खुश असत. आजच्यासारखा ब्रेकिंग न्यूजचा जमाना नव्हता.

आज एक घटना घडत असताना त्याचे मिनिटा-मिनिटांचे अपडेट दिले जातात आणि लोक ते समजून घेण्यासाठी आतुर असतात; पण तेव्हा अशा बातम्या नसत. एकदा सकाळी आणि पुन्हा रात्री बातम्या ऐकल्या की गावातील लोक आपापल्या उद्योगात रमत. पुन्हा दिवसभर काय झाले, याची त्यांना उत्सुकता नसे. दिवसा काय घडले ते रात्रीच्या बातम्यांत समजत असे. कोणतीही घडलेली तात्काळ गोष्ट आपल्याला कळावी असा हव्यास त्यावेळी नव्हता.आज एखादी गोष्ट कानावर आली की पहिल्यांदा समाजमाध्यमांवर जाऊन सर्च केले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।  
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥  
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।  
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विकासकामांमुळे काटेंचा विजय निश्चित!

## चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : आमदार रोहित पवार यांचा दावा

।पिंपरी। महाईन्यूज ।

**भाजपच्या भ्रष्ट कारभाराला इथली जनता वैतागली आहे. पिंपरी-चिंचवडचा विकास फक्त अजितदादांच्या मार्गदर्शनाखाली झालेला आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही. भाजपच कोणताही नेता निवडणुकीमध्ये सहभागी होत नसल्याने त्यांनी हार स्वीकारल्याची मानसिकता दिसून येते. कोणताही गाजावाजा न करता आपले काम शांतपणे विकासकाम करणारे महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे त्यांनी केलेल्या विकासकामांच्या पुण्याईवरच निश्चित निवडून येतील, असा विश्वास राष्ट्रवादीचे युवा नेते तथा कर्जत -जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला.**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारार्थ निघालेल्या पदयात्रेत आमदार रोहित पवार सहभागी झाले होते.

यावेळी त्यांच्यासमवेत पदयात्रेत नाना काटेंसह प्रचारप्रमुख भाऊसाहेब भोईर, माजी नगरसेविका शमीम पठाण, वैशालीताई काळभोर, सुलक्षणा शिलवंत, माऊली सूर्यवंशी, लाला चिंचवडे, विनोद कांबळे, ज्योतीताई गोफणे, संगीताताई कोकणे, सचिन नखाते, अभिजित भालेराव, धनंजय भालेकर, धनंजय वाल्हेकर आदींसह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ही पदयात्रा प्रभाग क्रमांक 26 मधील बिजली नगर, चिंचवडे नगर, आशाताई माऊली सूर्यवंशी संपर्क कार्यालय, गणपती मंदिर, शिवनगरी चौक, तुळजाभवानी मंदिर, साई मंदिर, बळवंत नगर, हनुमान मंदिर, साईराज कॉलनी, स्पाईन रोड,चौक, दगडोबा चौक आदी मार्गांवरून निघाली.



### आ. रोहित पवार.. वडापाव.. आणि गप्पा !

आ. रोहित पवार हे जसे परखड, अभ्यासू आणि फर्डे वक्ते म्हणून ओळखले जातात, तसेच एक अतिशय साधा माणूस म्हणूनही लोक त्यांना ओळखतात. याचा प्रत्यय शुक्रवारी चिंचवडमध्ये आला.

महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारफेरीत सहभागी झालेले आ. रोहित पवार यांनी भूक लागल्यामुळे सर्वांना थांबवून चक्क साई टी स्टॉल या दुकानातील वडापावचा मनसोक्त आस्वाद घेतला !

वडापाव खाता खाताच ते उपस्थित महिलांशी तसेच प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशीही बोलत होते. कोणताही बडेजावपणा न दाखवणाऱ्या आ. रोहित पवार यांच्या या साधेपणाची प्रचारादरम्यान चर्चा रंगली.

### राहूल कलाटेंना वीस हजार मते पडतील-पवार

आ. रोहित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले की, बंडखोर उमेदवार राहुल कलाटे हे अहंकाराची भाषा बोलत आहेत. नागरिक अहंकार स्वीकारत नाहीत. त्यांना वीस हजार मते पडतील. जगताप कुटुंबाबद्दल नागरिकांमध्ये सहानुभूती आहे. मात्र अजित पवार यांनी केलेला विकास हे नागरिक विसरले नाहीत. भाजपाला आम्ही मत देणार नाही उलट राष्ट्रवादीला निवडून आणणार असल्याचे वातावरण नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे शांततेत लोकांची कामे करणारे नाना काटे हे प्रचंड मतांनी निश्चित विजयी होणार आहेत.

# दुर्बल घटकांच्या विकासासाठीच मैदानात

## सिद्धिक शेख : चिंचवड पोटनिवडणुकीत 'सफरचंद'चा प्रचार जोरात

।पिंपरी। महाईन्यूज ।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीच्या प्रचाराला वेग आला आहे. मतदार संघाचा कायापालट कशा प्रकारे करणार आहेत, याचा जाहिरनामा लोकांपर्यंत पोहोचविण्यात उमेदवार व्यस्त आहेत. गोरगरीब, वंचित, दुर्बल घटकांच्या सर्वांगिण विकासासाठीच निवडणुकीच्या रिंगणात आपण उतरलो असल्याचे अपना वतन संघटनेचे पुरस्कृत उमेदवार सिद्धिक ईस्माईल शेख यांनी जाहिर केले आहे. सध्या चिंचवड पोटनिवडणुकीसाठी मतदार संघात 'नेता नव्हे तर बेटा' म्हणून भेटण्यास येतोय, अशी कॅचलाईन घेऊन शेख यांचा झंझावाती प्रचार सुरू आहे.**





लहानपणापासून अतिशय खडतर संघर्ष करत आपण इथपर्यंत पोहोचलो असल्याचे सांगताना सिद्धिक इस्माईल शेख म्हणतात की, नोकरी करत असताना परिसरात सुरू असलेल्या चुकीच्या गोष्टी पाहवत नव्हत्या. आपण समाजासाठी, देशासाठी काहीतरी केलं पाहिजे, यातून शिव-शाहू -फुले-आंबेडकरांच्या विचारधारेची कास धरून, सर्व सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अपना वतन संघटनेची सुरूवात केली, असे सिद्धिक ईस्माईल शेख यांनी सांगितले.

सिद्धिक ईस्माईल शेख यांना सफरचंद हे चिन्ह मिळाले असून, मतदार संघातील वंचित घटकांतील उमेदवार असल्यामुळे त्यांना सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

> भारतीय संविधानाप्रमाणे देशातील सर्व जाती-धर्माच्या नागरिकांना समान न्याय व विकासाच्या संधी मिळाल्या पाहिजेत यासाठी प्रशासनासोबत पत्रव्यवहार, आंदोलने व मोर्चाच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लावलेले आहेत. चिंचवड पोटनिवडणूकीत विजयी झाल्यास वंचित, गोरगरीब दुर्बल घटकांच्या सर्वांगिण विकासासाठीच कायम प्रयत्नशील असेन.
>
> - सिद्धिक ईस्माईल शेख, अपक्ष उमेदवार.

# मराठीतून शपथ घेत राज्यपाल रमेश बैस यांनी स्वीकारला पदभार

। मुंबई । महाईन्यूज ।



महाराष्ट्राचे नवे राज्यपाल रमेश बैस यांनी मराठीतून राज्यपालपदाची शपथ घेतली. बैस महाराष्ट्राचे २० वे राज्यपाल आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती संजय व्ही. गंगापूरवाला यांनी बैस यांना राज्यपाल पदाची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर,पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर रमेश बैस यांची महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. राष्ट्रपती भवनाने देशातील १३ राज्यपालांची बदली केली. याआधी रमेश बैस हे झारखंडचे राज्यपाल होते. त्याआधी त्यांनी त्रिपुरा राज्याचे राज्यपालपदही सांभाळले होते.२ ऑगस्ट १९४७ रोजी जन्मलेल्या रमेस बैस यांनी वाजपेयी सरकारच्या काळात राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. रमेश बैस हे सात वेळा खासदार राहिलेले आहेत. भाजपाचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. छत्तीसगढचे मध्य प्रदेशमधून विभाजन होण्याअगोदर त्यांनी मध्य प्रदेशचे आमदार म्हणूनही काम पाहिले. आजवर एकही निवडणूक पराभूत न झालेला नेता, अशी त्यांची ओळख आहे. रमेश बैस यांनी छत्तीसगढ मधील रायपूर मतदारसंघाचे लोकप्रतिनिधित्व केलेले आहे. १९७८ मध्ये ते पहिल्यांदा रायपूर महानगरपालिकेत निवडून आले होते. त्यानंतर त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख चढता राहिला. १९८० पासून १९८४ पर्यंत ते मध्यप्रदेश विधानसभेचे सदस्य होते. १९८९ मध्ये तेव्हाच्या एकत्रित मध्य प्रदेश (आता छत्तीसगढ) च्या रायपूर लोकसभा मतदारसंघातून ते पहिल्यांदा खासदार बनले.

# काँग्रेसचा बालेकिल्ला ढासळला!

## अमूल डेअरीवर भाजपाची सत्ता

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपाने १५६ जागा जिंकत मोठा विजय संपादन केला. या विजयाने भाजपाने संपूर्ण देशाचं लक्ष वेधून घेतलं. विधानसभा निकालानंतर भाजपाने गुजरातमधील आणि देशातील पहिल्या अमूल दूध डेअरीकडे आपला मोर्चा वळवला. १९४६ साली भारतातील पहिली डेअरी सहकारी संस्था म्हणून अमूलची स्थापना करण्यात आली होती. तेव्हापासून अमूल दूधसंघावर काँग्रेसची एकहाती सत्ता होती.**

यामुळे अमूल वगळता गुजरातमधील १८ दूध सहकारी संस्था १०० टक्के भाजपाच्या ताब्यात आहेत. अमूल ही एकमेव डेअरी सहकारी संस्था आहे, ज्यात काँग्रेसचे काही सदस्य बाकी आहेत. इतर दूधसंघात १०० टक्के भाजपाचे सदस्य आहेत.भाजपातील अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विधानसभा निवडणुकीनंतर भाजपाने अमूल डेअरीवर आपलं वर्चस्व निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक काम केले. त्यांनी अमूलच्या बोर्डवर असणाऱ्या काँग्रेसच्या पाच नेत्यांना भाजपामध्ये आणलं. त्यानंतर मंगळवारी अखेर भाजपा नेते विपुल पटेल यांची सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी आणि काँग्रेसमधून नुकतंच भाजपावासी झालेल्या कांती परमार सोढा यांची उपाध्यक्षपदी निवड झाली.

यापूर्वी, २००२ पासून अमूल डेअरीचे चेअरमन आणि काँग्रेसचे माजी आमदार रामसिंह परमार यांनी २०१७ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला. मात्र, आनंद आणि खेडा हे जिल्हे काँग्रेसचे बालेकिल्ले असल्याने अमूल बोर्डावर अजूनही काँग्रेसचा वरचष्मा कायम होता. पण गेल्या आठवड्यात भाजपाच्या मास्टरस्ट्रोकमुळे काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या अमूल डेअरीवरील पक्षाचं वर्चस्व संपुष्टात आलं. अमूल डेअरीच्या पाच संचालकांनी भाजपात प्रवेश केला आहे.

गेल्या पाच दिवसांत काँग्रेसने अमूल डेअरीच्या संचालक मंडळातील चार संचालक तर गमावलेच शिवाय शेवटचा बालेकिल्लाही ढासळला.



अमूलच्या संचालक मंडळातील काँग्रेसच्या चार नेत्यांनी ११ फेब्रुवारी रोजी गांधीनगर येथे प्रदेशाध्यक्ष सी आर पाटील यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. त्यामुळे काँग्रेसकडे केवळ दोनच सदस्य उरले आहेत. जोवनसिंह चौहान (मोडज), सीता चंदू परमार (तारापूर), शारदा हरी पटेल (कपडवंज) आणि घेला मानसिंह झाला (काठलाल) या नेत्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. सप्टेंबर २०२०मध्ये पार पडलेल्या दूध संघाच्या निवडणुकीत काँग्रेसने ११ पैकी आठ जागा जिंकल्या होत्या.

पण काँग्रेसचे माजी आमदार कांती सोडा परमार यांनी गेल्यावर्षी भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर आता अन्य नेतेही भाजपावासी झाले. परिणामी अमूल डेअरीवरील काँग्रेसची सत्ता संपुष्टात आली.

## अदानीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयच नेमणार समिती

### केंद्राची सीलबंद लिफाफ्यातील नावे स्वीकारण्यास नकार

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

अदानी समूह-हिंडेनबर्ग प्रकरणावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याबाबतची सूचना असलेला सीलबंद लिफाफा सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्यामार्फत न्यायालयात सादर केला, परंतु या प्रकरणात पूर्ण पारदर्शकता हवी आहे, असे म्हणत हा सीलबंद लिफाफा स्वीकारण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नकार दिला. याचसोबत आम्ही स्वत:च समितीतील सदस्यांच्या नावांची सूचना करू, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

शुक्रवारी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत केंद्र सरकार तज्ज्ञांची नावे आणि समितीच्या कामाची व्याप्ती सीलबंद कव्हरमध्ये देऊ इच्छित आहे, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकार आणि सेबीच्या वतीने सांगितले. त्यावर आम्ही कोणतेही सीलबंद कव्हर



स्वीकारणार नाही. याप्रकरणी आम्हाला संपूर्ण पारदर्शकता हवी आहे. आम्ही या सूचना मान्य केल्या तर त्याकडे सरकार नियुक्त समिती म्हणून पाहिले जाईल, जे आम्हाला नको. आम्ही स्वत: समितीतील सदस्यांच्या नावांची सूचना करू. विद्यमान न्यायाधीश या समितीचा भाग नसतील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

हिंडेनबर्गच्या अहवालानंतर अदानी समूहातील कंपन्यांचे शेअर्स ७० टक्क्यांपर्यंत कोसळले आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. यासंदर्भात दाखल झालेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना अदानी समूहाच्या स्टॉक रुटसंदर्भातील अस्थिरता बघता भारतीय गुंतवणूकदारांचे हित संरक्षित करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने केंद्र सरकार आणि सेबीला उद्देशून म्हटले होते. यावर शेअर बाजारासाठी नियामक यंत्रणा बळकट करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याच्या प्रस्तावावर आपला कोणताही आक्षेप नसल्याचे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले होते.

### मोदींना संसदेत उत्तर द्यावेच लागेल

**अमेरिकेतील अब्जाधीश जॉर्ज सोरोस यांनी जर्मनीतील म्युनिक विद्यापीठात झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना अदानी समूहाच्या प्रकरणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. मोदी अदानी प्रकरणावर अद्याप मौन बाळगून आहेत, पण परदेशी गुंतवणूकदार आणि संसदेला त्यांना उत्तर द्यावेच लागेल, असे सोरोस म्हणाले, तर जॉर्ज सोरोससारख्या लोकांनी आमच्या देशांतर्गत प्रश्नांमध्ये नाक खुपसू नये, असे प्रत्युत्तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी दिले आहे.**

## पाकिस्तानच्या कराची पोलीस मुख्यालयावर दहशतवादी हल्ला

### स्फोटात 6 जणांचा मृत्यू, 12 जखमी

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

पाकिस्तानातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या कराची शहरातील पोलीस मुख्यालयावर शुक्रवारी दहशतवादी हल्ला झाला आहे. आठ ते दहा दहशतवाद्यांनी कराची पोलीस मुख्यालयात शिरून अंधाधुद गोळीबार सुरु केला. यावेळी सुरक्षा कर्मचारी आणि दहशवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत पाच दहशतवादी ठार झाले आहे. तहरीक- ए- तालिबान पाकिस्तानने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानच्या स्थानिक वेळेनुसार सायंकाळी 7.10 वाजता शाहराह-ए-फैसल या भागात हा दहशतवादी हल्ला झाला, यानंतर रात्री 10.50 पर्यंत सुरक्षा दल आणि दहशवाद्यांमध्ये चकमक सुरु होती. कराची पोलीस मुख्यालयात घुसलेल्या दहशतवाद्यांमध्ये मोठाप्रमाणात शस्त्रास्त्र आणि दारुगोळा होता. या दहशवाद्यांकडे हँडग्रेनेड आणि ऑटोमॅटिक गन



सापजडल्या आहेत. ज्यांच्या मदतीने ते सतत हल्ला करत होते. दरम्यान कराची पोलीस प्रवक्त्यांनी कराची पोलिस प्रमुखांच्या मुख्यालयावर दहशतवादी हल्ला झाला याची पुष्टी केली आहे. कराची पोलीस प्रमुख जावेद ओढो यांनी ट्विट करत सांगितले की, पाकिस्तान सुरक्षा दलांनी दहशवाद्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सुमारे चार तासांच्या कारवाईनंतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांनी शहर पोलिस प्रमुखांचे पाच मजली कार्यालय रिकामे केले.

सिंध सरकारचे प्रवक्ते मुर्तझा वहाब यांनी ट्विट करत सांगितले की, दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीस मुख्यालयाची इमारत रिकामी करण्यात आली आहे. या हल्ल्यात पाच दहशतवादी मारले गेले आहेत. तर दोन पोलिस अधिकाऱ्यांसह चार जणांचाही मृत्यू झाला. तसेच सुरक्षा कर्मचाऱ्यांसह 14 जण जखमी झाले आहेत.समोर आलेल्या माहितीनुसार, सर्वप्रथम काही दहशतवादी पोलीस मुख्यालयाच्या इमारतीच्या मागच्या बाजूने घुसले, तर दोन दहशतवाद्यांनी पोलिसांच्या गणवेशात मुख्य गेटमधून प्रवेश केला. दहशतवाद्यांनी आधी कराची पोलीस प्रमुख कार्यालयाच्या इमारतीच्या मुख्य आवारात सहा हातबॉम्ब फेकले आणि नंतर आवारात प्रवेश केला.

## कुटुंब आणि काम कसं सांभाळतेस?

अभिनेत्री व अभिनेता रितेश देशमुखची पत्नी जिनिलीया देशमुख खूप लोकप्रिय आहे. हे जोडपं गेल्या काही दिवसांपासून त्यांचा मराठी चित्रपट वेडमुळे चर्चेत होते. जिनिलीया ही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे.

ती सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांच्या कायम संपर्कात असते. आज जिनिलीयाने इन्स्टाग्रामवर काही चाहत्यांच्या प्रश्नांची उत्तरं दिली. तिने ‘ASK ME A QUESTION’ हे सेशन ठेवलं होतं. यामध्ये तिला चाहत्यांनी काही प्रश्न विचारले त्याची उत्तरं तिने दिली. यातच एका युजरने तिला कुटुंब आणि काम कसं सांभाळतेस? असा प्रश्न विचारला होता.

त्यावर जिनिलीया म्हणाली, “सगळं काम करण्यास इच्छुक असलेल्या हृदयासाठी काहीही अशक्य नाही.”याशिवाय जिनिलीयाने आणखी काही प्रश्नांची उत्तरं दिली. तिला तिचा आवडता परफ्युम ब्रँड आणि खाद्यपदार्थांबद्दल प्रश्न विचारण्यात आले, त्यालाही जिनिलीयाने मनमोकळेपणानं उत्तरं दिली.

दरम्यान, जिनिलीयाने ती गृहिणी असल्याबाबत सांगितलं होतं. ती म्हणाली, “गेल्या दहा वर्षांपासून मी गृहिणी आहे. रितेश, माझी मुलं, रितेशची आई यांच्याबरोबरच मी गेली १० वर्ष आहे. ही मंडळीच माझं आयुष्य आहेत.”



# स्वरा भास्करने दिला सुखद धक्का; सपा नेत्यासोबत थाटला संसार

सध्या बॉलिवूडमध्ये देखील लग्नाचा ट्रेंड सुरु आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी कियारा-सिद्धार्थचं लग्न पार पडलं त्याआधी आथिया आणि केएल राहूल देखील विवाहबंधनात अडकले होते. अशातच आता बॉलिवूड अभिनेत्री स्वरा भास्करने गुरुवारी अचानक तिच्या लग्नाबाबत खुलासा करत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. खरं तर, स्वराचं लग्न 6 जानेवारी रोजी झालं होतं. मात्र, नुकताच तिने लग्नाबाबत खुलासा केला आहे. स्वराने समाजवादी पक्षाचा नेता फहाद जिरार अहमदसोबत कोर्ट मॅरेज केलं आहे. तिच्या लग्नाचे फोटो तिने स्वतः तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करुन चाहत्यांना ही बातमी दिली आहे.

स्वरा भास्करने दिली आनंदाची बातमी

स्वराने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर लग्नाचे फोटो शेअर करत केले आहेत. या फोटोंमध्ये तिने रेड कलरची सुंदर साडी नेसली आहे. तर तिचा पती फहाद जिरार अहमदने व्हाईट कुर्ता आणि त्यावर रेड जॅकेट परिधान केलं आहे. या दोघांच्या साध्या लूकचं चाहते कौतुक करत आहेत. शिवाय स्वराने तिच्या आणि फहाद जिरार अहमदच्या संपूर्ण लव्हस्टोरीचा एक व्हिडीओ देखील शेअर केला आहे. जो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. 4 वर्षांपेक्षा लहान पती



स्वरा भास्करने काल फहाद जिरार अहमदसोबत साध्या पद्धतीने कोर्ट मॅरेज केलं. स्वराचा पती तिच्या पेक्षा वयाने 4 वर्षांपेक्षा लहान आहे. तिचा पती समाजवादी पक्षाचा नेता आहे. त्यांची पहिली भेट 2019 मध्ये झालेल्या आंदोलनात झाली. तिथेच त्यांची चांगली ओळख झाली. पुढे हळूहळू मैत्री, त्यानंतर प्रेम आणि आता त्याचे रुपांतर लग्नात झाले आहे.



## अंकिता लोखंडे गरोदर?

लग्नाला १ वर्ष पूर्ण होताच अंकिता लोखंडे गरोदर? प्रतिक्रिया देत अभिनेत्री म्हणाली, “मला आनंद होतो कारण...”

‘पवित्र रिश्ता’ फेम अंकिता लोखंडे ही नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेत असते. तिने डिसेंबर २०२१ मध्ये विकी जैन याच्याशी लग्न केलं. अंकिता-विकीचा विवाहसोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला होता. अंकिता लोखंडे आणि विकी जैन यांच्या लग्नाला १ वर्ष पूर्ण झालं आहे. आता अशातच गेले काही दिवस ती गरोदर असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आता स्वतः अंकितानेच यावर मौन सोडलं आहे.

विकीशी लग्न केल्यावर काही महिन्यातच तिचे अनेक फोटो व्हायरल झाले होते. त्या फोटोंमध्ये तिने परिधान केलेले ढगळ कपडे पाहून ती गरोदर असल्याचा नेटकरी म्हणू लागले होते. बरेच दिवस या चर्चा सुरू होत्या. आता अखेर अंकितानेच यावर भाष्य केलं आहे.पिंकविलाशी बोलताना ती म्हणाली, “आधी माझ्या लग्नाबद्दल चर्चा रंगू लागल्या होत्या, त्यानंतर प्रेग्नंन्सी आणि मग आमचा घटस्फोट होणार असं लोक बोलू लागले होते. पण या सगळ्या बोलण्याने मला काही फरक पडत नाही. लोक त्यावर बोलतील, पण जोपर्यंत ते चांगले बोलतात तोपर्यंत ठीक आहे. जेव्हा ते त्रासदायक गोष्टी बोलतात तेव्हा माझ्यावर त्याचा थोडा परिणाम होतो. जर ते माझ्या प्रेग्नंन्सीबद्दल बोलले तर मला खूप आनंद होतो, कारण मी नक्कीच एक दिवस गरोदर राहीन आणि हे मी स्वतः सगळ्यांना सांगेन.” दरम्यान अंकिता लोखंडे सोशल मीडियावर सक्रिय राहून तिच्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घडामोडी तिचा चाहत्यांची शेअर करत असते. विकी जैनबरोबर ती सुखात असल्याचंही तिने सांगितलं. त्यामुळे आत्ता ती गरोदर नाही आणि तिचा घटस्फोटही होणार नाहीये हे स्पष्ट करत तिने सर्व अफवांना पूर्णविराम लावला.

## महाशिवरात्रीनिमीत्त प्रभासनं चाहत्यांना दिली मोठी गुडन्यूज



साउथचा बाहुबली जो बॉलिवूडसह सर्वांनाच जड पडला असा प्रभास आपल्या दमदार अभिनयाने चाहत्यांच्या मनावर राज्य करत आहे. त्याचे चाहते प्रभासच्या चित्रपटांची आतुरतेने वाट पाहतात. बाहुबली 2 नंतर प्रभासचे दोन चित्रपट फ्लॉप गेल असल तरी त्याचा काडीमात्र परिनाम त्याच्या स्टारडम झालेला नाही. प्रभासने आता महाशिवरात्रीनिमीत्त त्याच्या चाहत्यांसोबत मोठी बातमी शेअर केली आहे. प्रभासचे एक दोन नव्हे तर 3 बिग बजेट चित्रपट लवकरच येणार आहेत. आता प्रभासने त्याच्या आगामी आदिपुरुष, सालार, प्रोजेक्ट के या चित्रपटाची रिलीज डेट शेअर केली आहे. प्रभासने ट्विट करून ही आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली आहे. त्याचं हे ट्विट सध्या व्हायरल झालं असून चाहते त्याला शुभेच्छा देत आहेत.प्रभासने ट्विटमध्ये लिहिले- 'रिबेलस्टार या ट्विटमध्ये प्रभासने त्याच्या आगामी चित्रपटांच्या रिलीज डेटबद्दल लिहिले आहे. प्रभासचा 'आदिपुरुष' 16 जून 2023 रोजी , 28 सप्टेंबर 2023 रोजी 'सालार' प्रदर्शित होणार आहे. तर 12 जानेवारी 2024 रोजी 'प्रोजेक्ट के' रिलीज होणार आहे.

# स्मृतीचे अर्धशतक ठरले व्यर्थ!

## भारताचा इंग्लंडकडून 11 धावांनी पराभव, सेमीफायनलसाठी करावी लागणार कसरत

**।मुंबई। महाईन्यूज ।वृत्तसंस्था।**

**दक्षिण आफ्रिका येथे सुरू असलेल्या महिला टी२० विश्वचषकात शनिवारी (१८ फेब्रुवारी) भारत विरुद्ध इंग्लंड सामना संपन्न झाला. इंग्लंडने टीम इंडियाचा ११ धावांनी पराभव करत गुणतालिकेत पहिले स्थान अबाधित राखले आहे. धडाकेबाज फलंदाज स्मृती मंधनाने झुंजार अर्धशतक केले मात्र ते भारताला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले. रिचा घोषची शेवटच्या षटकातील फटकेबाजी देखील टीम इंडियाला पराभवापासून वाचवू शकली नाही. तिन्ही सामन्यात ती नाबाद राहिली.**



इंग्लंडने ठेवलेल्या १५२ धावांचा पाठलाग करताना भारताने सावध सुरुवात केली. सलामीवीर शफाली वर्मा ८ धावा करून बाद झाली. मात्र स्मृती मंधनाने ४१ चेंडूत अर्धशतकी खेळी केली. कर्णधार हरमनप्रीत कौरला मोठी खेळी करता आली नाही तिचा खराब फॉर्म अजूनही सुरूच असून तिच्यावर खूप टीका होताना दिसत आहे, ती अवघ्या ४ धावांत बाद झाली. पाकिस्तानविरुद्धची सामनावीर जेमिमाह रॉड्रिग्स केवळ १३ धावा करून बाद झाली. प्रत्येक सामन्यात उत्तम फिनिशरचे काम करणारी रिचा घोषने यासामन्यात देखील ४७ धावा केल्या. परंतु दुसऱ्या बाजूला तिला साथ देण्यासाठी कोणीही नव्हते, भारत केवळ १४० धावाच करू शकला. सारा ग्लेनने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या.तत्पूर्वी, भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर हिने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय संघाची प्रमुख वेगवान गोलंदाज असलेल्या रेणुका सिंग ठाकूर हिने शानदार गोलंदाजी करत पाच विकेट्स आपल्या नावे केले. यासोबतच तिने एक विक्रमही आपल्या नावे केला. पहिल्या दोन सामन्यात रेणुकाला फारशी चांगली गोलंदाजी करता आली नव्हती. मात्र, या सामन्यात तिने ते अपयश भरून काढले. तिने पहिल्याच षटकात डॅनी वॅटला तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर सोफी डंकली व एलिस कॅप्सी यांना बाद करत तिने इंग्लंड संघाला संकटात टाकले. त्यानंतर डावातील अखेरचे षटक टाकण्यासाठी आल्यानंतर तिने एमी जोन्स व कॅथरीन सिव्हर ब्रंट हिला बाद करत आपले पाच बळी पूर्ण केले. आपल्या चार षटकांच्या स्पेलमध्ये तिने १५ धावा दिल्या.

भारतीय महिला संघाकडून टी२० क्रिकेटमध्ये केलेली ही दुसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली. यापूर्वी झुलन गोस्वामीने ऑस्ट्रेलिया विरुद्ध केवळ ११ धावांमध्ये पाच फलंदाजांना बाद केलेले. तसेच, इंग्लंडविरुद्ध टी२० विश्वचषकात कोणत्याही देशाच्या गोलंदाजांनी केलेली ही सर्वोत्कृष्ट आकडेवारी ठरली. इंग्लंडच्या डावाचा विचार केल्यास तीन प्रमुख फलंदाज लवकर बाद झाल्यानंतर नॅट सिव्हरने जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. तिने आक्रमक अर्धशतक झळकावले. तर, कर्णधार हिदर नाईटने २८ व एमी जोन्सने ४० धावांचे योगदान दिले. या सामन्यात विजय मिळवणारा संघ थेट उपांत्य फेरीत आपली जागा पक्की करेल.

टीम इंडियाची नजर या स्पर्धेत सलग तिसऱ्या विजयावर होती मात्र भारताच्या पदरी निराशा आली. हरमनप्रीतच्या संघाने पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा तर दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा पराभव केला.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन सामने अन् 'या' दिग्गज खेळाडूची कारकीर्द संपुष्टात!

**।दुबई। महाईन्यूज ।वृत्तसंस्था।**



ऑस्ट्रेलियाविरुद्ध दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात टीम इंडियाचा एक खेळाडू पुन्हा फ्लॉप झाला. मालिकेतील पहिल्या सामन्यातही आपली छाप सोडण्यात तो अपयशी ठरला. या खेळाडूला संघातून वगळण्याची मागणीही करण्यात आली, मात्र कर्णधार रोहित शर्माने या खेळाडूवर विश्वास दाखवत त्याला दिल्ली कसोटीत संधी दिली, मात्र त्याचा फायदा उठवण्यात तो अपयशी ठरला.

या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. खेळाच्या पहिल्या दिवशी भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव 263 धावांत गुंडाळला. अशा स्थितीत टीम इंडियाला चांगल्या सुरुवातीची गरज होती, मात्र सलामीवीर केएल राहुल पुन्हा एकदा अपयशी ठरला. दिल्ली कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात 41 चेंडूत 17 धावा करून तो पॅव्हेलियनमध्ये परतला. या खेळीदरम्यान त्याने एकही चौकार मारला नाही, तर एक षटकारही मारला.रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने चार सामन्यांच्या बॉर्डर गावसकर ट्रॉफीची धमाकेदार सुरुवात करून नागपूरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धची पहिली कसोटी एक डाव आणि 132 धावांनी जिंकून दिली. पण या सामन्यातही केएल राहुल संघावर ओझे ठरला आहे. या सामन्यात केएल राहुल केवळ 20 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यादरम्यान राहुलने 71 चेंडूंचा सामना करत चौकार लगावला. केएल राहुलला गेल्या 10 डावांमध्ये एकही शतक झळकावता आलेले नाही. त्याच्या शेवटच्या 10 डावांच्या स्कोअरवर नजर टाकली तर तो आहे. 23, 50, 8, 12, 10, 22, 10, 2, 20 आणि 17 धावा. केएल राहुल सध्या अतिशय खराब फॉर्ममध्ये आहे. कसोटीत तो भारतीय संघाचा उपकर्णधारही आहे, पण तो स्वतः संघावर ओझे ठरत आहे. आगामी सामन्यात टीम मॅनेजमेंट केएल राहुलला प्लेइंग 11 मधून बाहेर ठेवण्याचे पाऊल उचलू शकते.

### केएल राहुल संघावर ओझे ठरला

**» रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने चार सामन्यांच्या बॉर्डर गावसकर ट्रॉफीची धमाकेदार सुरुवात करून नागपूरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धची पहिली कसोटी एक डाव आणि 132 धावांनी जिंकून दिली. पण या सामन्यातही केएल राहुल संघावर ओझे ठरला आहे. या सामन्यात केएल राहुल केवळ 20 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यादरम्यान राहुलने 71 चेंडूंचा सामना करत चौकार लगावला.**

# '१८ नंबरची खेळाडू करणार RCB चे नेतृत्व!

## स्मृती मंधानाला केले कर्णधार म्हणून घोषित



**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।वृत्तसंस्था।**

महिला प्रीमियर लीगच्या पहिल्या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव संपला असून पाचही फ्रँचायझींनी आपले संघ तयार केले आहेत. आता सर्व संघ आपला कर्णधार ठरवत आहेत आणि अंतिम ११ खेळाडू खेळणार आहेत, लवकरच संघांची तयारी सुरू होईल आणि मार्चमध्ये महिला प्रीमियर लीगचा उत्साह पाहायला मिळेल. या लीगमध्ये कर्णधाराची घोषणा करणारा RCB हा पहिला संघ ठरला आहे. आरसीबीने स्मृती मंधानाला कर्णधार बनवले आहे.

आयपीएलमधील आरसीबी संघाचा माजी कर्णधार विराट कोहली आणि सध्याचा कर्णधार फाफ डुप्लेसिसने एका व्हिडिओमध्ये महिला प्रीमियर लीग संघाच्या कर्णधाराची घोषणा केली. या व्हिडिओमध्ये विराट कोहली म्हणाला की जवळजवळ एक दशक आरसीबीचे कर्णधारपद हे त्याच्यासाठी खूप खास आहे आणि त्याला आनंद आहे की आणखी एका जर्सी क्रमांक १८ ला या फ्रेंचायझीचे कर्णधारपद मिळाले आहे.फाफ डुप्लेसिस म्हणाला की, “गेले दोन महिने आरसीबीसाठी खूप खास होते. प्रथम, फ्रँचायझी महिला संघाचे हक्क विकत घेण्यास सक्षम होती आणि नंतर खेळाडूंच्या लिलावात एक मजबूत संघ तयार केला. आता स्मृती मंधानाची कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.